**केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रमांतर्गत अमरावती, यवतमाळ, हिंगोली व अकोला येथील जिल्हा/उपजिल्हा/स्त्राी रुग्णालय अशा एकूण ०५ रूग्णालयांचे बांधकाम करण्यासाठी अनुदान (केंद्र व राज्य हिस्सा ) वितरित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**अल्पसंख्याक विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः अ.वि.वि-२०२०/ प्र.क्र.१९/का-७**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक

मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२

तारीखः १६ जून,२०२६

**संदर्भ :-**

१. संचालक आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र जा.क्र.संआसे/कक्ष-७ अ/टे-८/अल्पसंख्याक विकास विभाग/निधी/७९१/२०२० दिं.१७/०२/२०२०.

२. सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.३७/आ-३, दि.२४/०२/२०२०.

३. अल्पसंख्याक कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या ३० व्या Empowered Committee च्या बैठकीचे इतिवृत्त दि.१२/०१/२०२१.

४. अवर सचिव, अल्पसंख्याक कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. १३/७/२०२०- MsDP-MOMA, दि.०१/०२/२०२१.

५. शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. अविवि-२०२०/प्र.क्र.१९/का-७, दि.२२.०३.२०२१.

६. शासन ज्ञापन, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.अ.वि.वि.-२०२०/प्र.क्र.२७/ का. ७, दि. २२.०४.२०२२

७. शासन ज्ञापन, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.अ.वि.वि.-२०२०/प्र.क्र.२८/ का. ७, दि. २६.०४.२०२२

८. शासन ज्ञापन, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.अ.वि.वि.-२०२०/प्र.क्र.३१/ का. ७, दि. २६.०४.२०२२

९. शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. अविवि-२०२०/प्र.क्र.१९/का-७, दि.२८.०३.२०२४.

१०. शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. अविवि-२०२०/प्र.क्र.१९/का.७, दि. ०४.०३.२०२५

११. शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. अविवि-२०२०/प्र.क्र.१९/का.७, दि. ०४.०७.२०२५

१२. शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. अविवि-२०२०/प्र.क्र.१९/का.७, दि. ०१.१०.२०२५

१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांचे दि. १८.०२.२०२६ चे पत्र.

१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे दि. मार्च, २०२६ चे पत्र.

१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांचे दि. ०५.०३.२०२६ चे पत्र.

१६. सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे दि. २९.०५.२०२६ चे पत्र.

**प्रस्तावना :-**

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रमांतर्गत (PMJVK) केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाच्या गठित शक्तीप्रदान समितीने दि. २८.१२.२०२० रोजी झालेल्या ३० व्या बैठकीत अकोला (२), हिंगोली (१), अमरावती (२) आणि यवतमाळ (१) इत्यादी ६ ठिकाणी जिल्हा/ उपजिल्हा/स्त्री रुग्णालये बांधकामाकरीता रु. २४६१६.९/- लक्ष इतक्या रकमेच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. सदर प्रस्तावास केंद्र-राज्य हिस्सा हा ६०:४० असुन यामध्ये केंद्र शासनाचा एकुण हिस्सा रु. १४७७०.१४ लक्ष व राज्य शासनाचा एकुण हिस्सा रु. ९८४६.७ लक्ष इतका आहे.

२. संदर्भ क्र.५,९,१० व ११,१२ अन्वये विभागामार्फत अमरावती-०१ (अंजनगाव सुर्जी रुग्णालय) व हिंगोली-०१ (स्त्री रुग्णालय) तसेच यवतमाळ-०१ (पुसद-रुग्णालय), अकोला-०२ (शिवापुर व अकोट- रुग्णालय) या ५ रूग्णालये बांधकामाकरीता केंद्र हिश्श्यातील रू. **७६२९.३५**/- लाख तसेच राज्य हिश्श्यातील एकूण रू. **५०८६.२६/-** लाख असा एकूण (केंद्र + राज्य) रू. **१२७१५.६१/- लाख इतका निधी विहित अटींच्या अधिन राहून वितरीत करण्यात आला आहे.**

३. सन २०२२-२३ पासून केंद्र शासनाकडून प्रकल्पनिहाय निधी वितरीत करण्यात येत नाही. केंद्र शासनाकडून एखाद्या प्रकल्पाकरीता अगोदरच वितरीत करण्यात आलेला निधी राज्य शासनाकडे उपलब्ध असेल तर उपलब्ध असलेला निधी गरजेनुसार दुसरा प्रकल्प पूर्ण करण्याकरीता वापरून, प्रकल्प विहित वेळेत पूर्ण करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

४. सदर मार्गदर्शक सूचना विचारात घेता, प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रमांतर्गत **अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती येथे ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय बांधकाम** या प्रकल्पाकरीता केंद्र व राज्य हिश्श्यातील **एकुण रु. ५७९.१४ लक्ष**, जि. **हिंगोली मधील १०० खाटांचे स्त्री रुग्णालय बांधकाम** या प्रकल्पाकरीता एकुण **रु. ५००.०० लक्ष** इतका निधी तसेच **पुसद जि. यवतमाळ येथे ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय बांधकाम** या प्रकल्पाकरीता **रु. ४००.०० लक्ष** इतका तसेच **१०० खाटांचे जिल्हा रुग्णालय बांधकाम, शिवापुर,अकोला** या प्रकल्पाकरीता रु. **१२००.०० लक्ष** इतका निधी व **१०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय बांधकाम, अकोट, जि. अकोला** या प्रकल्पाकरीता **रु. ८००.०० लक्ष** इतका निधी SNA-SPARSH प्रणालीव्दारे प्रशासकीय अधिकारी,

सहसंचालक आरोग्य सेवा, (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना मंजूर करून वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

१. प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रमांतर्गत **अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती येथे ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय बांधकाम** या प्रकल्पाकरीता केंद्र व राज्य हिश्श्यातील **एकुण रु. ५७९.१४ लक्ष**, जि. **हिंगोली मधील १०० खाटांचे स्त्री रुग्णालय बांधकाम** या प्रकल्पाकरीता एकुण **रु. ५००.०० लक्ष** इतका निधी तसेच **पुसद जि. यवतमाळ येथे ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय बांधकाम** या प्रकल्पाकरीता **रु. ४००.०० लक्ष** इतका तसेच **१०० खाटांचे जिल्हा रुग्णालय बांधकाम, शिवापुर,अकोला** या प्रकल्पाकरीता रु. **१२००.०० लक्ष** इतका निधी व **१०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय बांधकाम, अकोट, जि. अकोला** या प्रकल्पाकरीता **रु. ८००.०० लक्ष** इतका निधी SNA-SPARSH प्रणालीव्दारे **प्रशासकीय अधिकारी, सहसंचालक आरोग्य सेवा, (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई** यांना खालील तक्त्यातील स्तंभ क्र (७) व (८) व (९) प्रमाणे मंजूर करून वितरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

(रु. लाखात)

| **ठिकाण** | **प्रकल्प किंमत** | | **एकुण वितरीत निधी** | | | **वितरीत करावयाचा निधी** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **केंद्र हिस्सा** | **राज्य हिस्सा** | **केंद्र हिस्सा** | **राज्य हिस्सा** | **एकुण** | **केंद्र हिस्सा** | **राज्य हिस्सा** | **एकुण** |
| **१.** | **२.** | **३.** | **४.** | **५.** | **६.** | **७.** | **८.** | **९.** |
| **५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय बांधकाम, अंजनगाव सूर्जी, अमरावती** | १३८९.९० | ९२६.६७ | १०४२.४४ | ६९४.९८ | १७३७.४२ | ३४७.४८ | २३१.६५ | ५७९.१४ |
| **१०० खाटांचे स्त्री** | २५४६.२० | १६९७.४५ | १९०९.६५ | १२७३.१३ | ३१८२.७५ | ३००.०० | २००.०० | ५००.०० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रुग्णालय बांधकाम, हिंगोली | | | | | | | | |
| ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय बांधकाम पुसद, जि. यवतमाळ | १२६४.७८ | ८४३.१८ | ६३२.३९ | ४२१.५८ | १०५३.९७ | २४०.०० | १६०.०० | ४००.०० |
| १०० खाटांचे जिल्हा रुग्णालय बांधकाम, शिवापुर,अकोला | २७६७.७० | १८४५.१० | १९३७.३६ | १२९१.५७ | ३२२८.९३ | ७२०.०० | ४८०.०० | १२००.०० |
| १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय बांधकाम, अकोट, जि. अकोला | ३०१०.८० | २००७.२० | २१०७.५१ | १४०५.०० | ३५१२.०५ | ४८०.०० | ३२०.०० | ८००.०० |

२. केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम या योजनेकरीता "SNA SPARSH" प्रणालीद्वारे निधी वितरीत करण्याकरीता विभागामार्फत भारतीय रिझर्व्ह बँके येथे स्वतंत्र आहरण खाते “GOMHSPARSHMH461” उघडण्यात आले आले असून त्याचा खाते क्र. “०१५८५९०१५५०” असा आहे. तसेच "SNA SPARSH" समायोचित प्रणाली अंतर्गत सायबर कोषागारावर देयके आहरित करण्याकरीता “कक्ष अधिकारी (कार्यासन-७), अल्पसंख्याक विकास विभाग” यांना सायबर आहरण व संवितरण अधिकारी (Cyber DDO) म्हणून घोषित करण्यात असून त्याचा सांकेतांक क्र. (Cyber DDO Code) ८१०१७१००१७ असा आहे.

३. उपरोक्त स्तंभ क्र.(९) मध्ये नमूद निधी SNA-SPARSH प्रणालीद्वारे प्रशासकीय अधिकारी, सहसंचालक आरोग्य सेवा, (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना वितरीत करण्यात येत आहे. याकरिता ते मुख्य नियंत्रक अधिकारी व अंमलबजावणी अधिकारी राहतील. प्रशासकीय अधिकारी, सहसंचालक आरोग्य सेवा,

(अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांनी SNA-SPARSH प्रणालीव्दारेच सदर रक्कम विकासकामांच्या अंमलबजावणीशी संबंधित अंमलबजावणी यंत्रणेस रीतसर वितरित करावा.

४. सदरचा खर्च करण्यास वित्तीय अधिकारांच्या मर्यादित.C.V.C च्या मार्गदर्शक तत्वानुसार / CAG या निर्देशानुसार कोणताही शासन निर्णय / अटी व शर्तीचा भंग होणार नाही, याची दक्षता संबंधितांनी घ्यावी. सदर रक्कम वितरित करण्यापूर्वी संबंधित अंमलबजावणी अधिकारी यांनी शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय / कार्यालयीन आदेश / वित्तीय नियमावली / सार्वजनिक बांधकाम विभागाची कार्यनियमावली / भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे निरिक्षण अहवाल / वित्तीय कार्यपध्दती यांचा अवलंब करावा. तसेच सदर रक्कम चालू आर्थिक वर्षात उपयोगात आणणे बंधनकारक राहील.

५. प्रशासकीय अधिकारी, सहसंचालक आरोग्य सेवा, (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांनी मान्यताप्राप्त विकासकामांच्या अमंलबजावणीसाठी उर्वरीत निधीची मागणी करताना यापुर्वी प्राप्त सर्व निधीच्या वापराबाबतची विहित नमुन्यातील उपयोगिता प्रमाणपत्रे (UC) तसेच त्रैमासिक अहवाल (QPR), अद्ययावत छायाचित्रांसह प्रस्तावासोबत शासनास सादर करावी. तसेच निधीचे उपयोगीता प्रमाणपत्र महालेखापाल कार्यालयास सादर करण्याची आणि महालेखापालांच्या लेख्याशी खर्चाचा ताळमेळ घालण्याची जबाबदारी प्रशासकीय अधिकारी, सहसंचालक आरोग्य सेवा, (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांची राहील.

६. हा शासन निर्णय वित्त विभाग शासन परिपत्रक ०९ एप्रिल, २०२६ अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकांरानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०६१६११४५११७६१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DEEPAK SURESH LOKARE

Digitally signed by DEEPAK SURESH LOKARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Minority Development Dept, 2.5.4.20=84FA0E4161C384FE5BB199680D742B01B9FF5E70EB03ACC5CF869939DF38FC7C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=96E09CC75F3C5CE534452384ACDEA2D6DE10039C9E34EAD32DBA3AC3466055D1, cn=DEEPAK SURESH LOKARE
Date: 2026.06.16 11:46:21 +05'30'

**(दिपक लोकरे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग (बांधकामे), मंत्रालय, मुंबई.

३. मा.मंत्री/राज्यमंत्री (अविवि) यांचे खाजगी सचिव.

४. आयुक्त, आरोग्य अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान,राआसो,मुंबई.

५. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.

६. प्रशासकीय अधिकारी, सहसंचालक आरोग्य सेवा, (अर्थ व प्रशासन)

७. सहसंचालक आरोग्य सेवा (प्रा.आ.केंद्र-जि.प.स्तर),

८. उपसंचालक, आरोग्य सेवा, संबधित विभागीय मंडळ.

९. विभागीय आयुक्त, अमरावती/छत्रपती संभाजीनगर.

१०. जिल्हाधिकारी,अमरावती/हिंगोली/यवतमाळ/अकोला.

११. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.

१२. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा व परीक्षा ) मुंबई/नागपूर.

१३. अधीक्षक अभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान,राज्य आरोग्य सोसायटी,मुंबई.

१४.कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान, अमरावती/हिंगोली/यवतमाळ/अकोला.

१५.जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रूग्णालय, अमरावती/हिंगोली/यवतमाळ/अकोला.

१६. वित्त विभाग (अर्थसंकल्प -१४/ व्यय -४) मंत्रालय, मुंबई.

१७.नियोजन विभाग (कार्या.१४७५)

१८.निवड नस्ती, का.७